ISSN 2319 - 359X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
HALF YEARLY RESEARCH JOURNAL

# IDEAL

Volume - X Issue - II March - August - 2022

English / Marathi / Hindi Part - II

Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal No. 47026

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2020 - 6.008
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖

Assit. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Math's), M.B.A. (Mkt), M.B.A (H.R),
M.Drama (Acting), M.Drama (Prod & Dirt), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

Govt. College of Arts & Science Aurangabad

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

# CONTENTS OF MARATHI


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | लोकसंगीत आणि शास्त्रीय संगीत<br>**श्री. शेखर श्रीराम रुद्र** | १-५ |
| २ | भारतीय संगीतामध्ये ठुमरीचे स्थान आणि वर्तमानात ठुमरीची स्थिती<br>**डॉ. जयश्री विश्राम कुलकर्णी** | ६-८ |
| ३ | वैदिक संगीत<br>**किरण प्रकाश सावंत** | ९-११ |
| ४ | जैन संगीतातील शास्त्रीय व उपशास्त्रीय संगीतरचना<br>**मेधा लखपति** | १२-१७ |
| ५ | भारतीय संगीतामध्ये ठुमरीचे स्थान आणि वर्तमानात ठुमरीची स्थिती<br>**प्रा. अरुणा च. हरले** | १८-२२ |
| ६ | लोक संगीत आणि शास्त्रीय संगीताची संकल्पना<br>**डॉ. सुरेखा रत्नपारखी (जोशी)** | २३-२९ |
| ७ | लोकसंगीत --- खंजिरी भजन<br>**सौ. दिपाली अविनाश शेरेकर** | ३०-३३ |
| ८ | ख्यालगायनाची वर्तमान स्थिती<br>**डॉ. प्रतिभा चंद्रहास्य पवित्रकार** | ३४-३८ |
| ९ | शास्त्रीय संगीतात तालाचे महत्व<br>**प्रा. विद्या प्र. गावंडे** | ३९-४१ |
| १० | लोकसंगीत व शास्त्रीय संगीताचा सहसंबंध<br>**वैशाली एस. चौरपगार (मोहोड)** | ४२-४४ |
| ११ | वेदकालीन भारतीय संगीत<br>**डॉ. वैशाली देशमुख** | ४५-४९ |




Govt. College of Arts & Science Aurangabad

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

VOLUME - X, ISSUE - II - MARCH - AUGUST - 2022
**IDEAL - ISSN - 2319 - 359X - IMPACT FACTOR - 6.008** (www.sjifactor.com) **AP - 7**

# ११. वेदकालीन भारतीय संगीत

**डॉ. वैशाली देशमुख**
सहयोगी प्राध्यापक, विभाग प्रमुख, संगीत विभाग, शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद.

भारतीय संगीताचा इतिहास हा ४००० वर्षापूर्वीचा इतिहास प्राचीनत्म इतिहास मानला जातो. वेदकालीन भारतीय संगीत जगातील प्राचीनतम संगीत मानले जाते. जर भारतीय संगीताचा इतिहास बघितला तर वैदिक काळ हा अतिशय महत्वाचा काळ मानला जातो. वेद हे भारतीय धर्माचे व संस्कृतीचे मुळाधार ग्रंथ मानले जातात. वेदांची निर्मिती ही ब्रम्हाव्दारे मानली जाते तर काही विद्वानांच्या मते अनेक ऋषींनी मिळून वेदांची निर्मिती केलेली आहे. जगातील पहीले साहीत्य म्हणजे वेद आहे. 'सर्वज्ञानमयो हि सः' याचा अर्थ सर्व प्रकारच्या ज्ञानाचा उगम वेदामध्ये आहे. सर्व धर्माचे मुळ वेदांमध्ये आहे असे मानले जाते. म्हणजेच 'वेदे ऽखिलो धर्म मूलम । महर्षी व्यास यांनी वेदांची रचना केली व असे म्हटले जाते डॉ.कर्ण सिंह यांनी वैदिक साहित्य का इतिहास या त्यांच्या पुस्तकात असे म्हटले आहे की वेदांचा काळ हा कमीत कमी सहा ते दोन हजार वर्षापूर्वीचा आहे. वैदिक काळ हा ई.स.पूर्व १००० मानला जातो. वेदांनाच संहिता देखील म्हटले जाते. वेदाचा अर्थ ज्ञान असा आहे.

महर्षी व्यास यांनी एकच वेद रचला परंतू तो समजण्यास सोपा व्हावा म्हणुन चार भाग केले. अशी कथा आहे. म्हणुन व्यासांना वेदव्यास असेही म्हणतात. तसेच वसिष्ठ, अत्रि, गृत्समद, भरव्दाज, अंगिरस, अथर्वण अशा अनेक ऋषीकुलांनी वेदांची रचना केली असावी असेही म्हटले जाते. वेद हे मानवसृष्टीच्या आधी परमेश्वराने मानवाच्या कल्याणासाठी निर्माण केले आणि म्हणूनच ते अनादि आहेत अशी वैदिकांची धारणा आहे. जे जगात नाही ते वेदात आहे असे म्हणतात. देवांनी निर्माण केल्यामुळे वेद स्वयं सिध्द व अपौरूषेय आहे असे म्हणतात. वेद चार मानले जातात. ऋग्वेद, यजुर्वेद, सामावेद, अथर्ववेद अशी चार वेदांची नावे आहेत. या वेदांचे संहीता, आरण्यके, ब्राम्हणे, आणि उपनिषदे हे चार उपविभाग आहेत. उपनिषदांना वेदांन्त असेही म्हटले जाते कारण ही सगळयात शेवटी येतात. हे सर्व साहीत्य संस्कृत भाषेत लिहीलेले आहे. वेदांचे जतन आणि प्रसार प्राचीन काळात मौखीक पध्दत्तीने केला जात असे म्हणून त्यांना श्रुति म्हटले जाते किंवा गायनासाठी योग्य वेदांच्या मंत्रांचा संग्रह म्हणजेच संहीता म्हटले जाते.

**चार वेदांचा अर्थ काय आहे ते थोडक्यात बघू**

**१. ऋग्वेद**

ऋच म्हणजे स्तूती, आणि ऋक चा अर्थ स्तुती मंत्र असा होतो. म्हणजेच ज्या ग्रंथात स्तुती केलेल्या मंत्रांचा संग्रह आहे असा वेद ऋचा म्हणजेच स्तुती करण्यासाठी रचलेले पदय.



Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

**२. यजुर्वेद**

'यज' चा अर्थ यज्ञ-पुजा करणे, ज्या ग्रंथात मंत्रांचा संग्रह यज्ञ करण्यासाठी आहे त्याला यजुर्वेद म्हणतात. यज्ञात म्हटले जाणारे मंत्र या संहितेत आहे.

**३. सामवेद**

या वेदामध्ये यज्ञ विधीच्या प्रसंगी मंत्रां चे ताला सुरात गायन कसे करावे याचे मार्गदर्शक या संहितेत केलेले आहे. 'स्वरः साम शब्देन लाका ऽ भिधीयत' म्हणजेच साम शब्दाचा अर्थ स्वर आहे.

**४. अथर्ववेद**

ज्या मंत्रांचा उपयोग शांतता, संयम, आयुष्यातील संकटांवर व दुःखावर कशा पध्दत्तीने उपाय करायचा हे सांगितले आहे. तसेच अनेक वनौषधी व राजाने राज्य कसे करावे याचे देखील मार्गदर्शन केले आहे.

चारही वेदांमध्ये मंत्रांची संख्या खालील प्रमाणे आहे :

१. **ऋग्वेद :** ऋग्वेदामध्ये मंत्रांची संख्या १०५२७ सांगीतली आहे.

२. **यजुर्वेद :** १९७५ गदयात्मक मंत्र यजुर्वेदामध्ये आहे.

३. **सामवेद :** संगीतातील गायनासाठी १८७५ संगीतमय मंत्र सामवेदात सांगीतले आहे.

४. **अथर्ववेद :** ५९७७ कवितेसारखे मंत्र अथर्ववेदात आहेत.

संपूर्ण जगात सर्वात प्राचीन संगीत साम वेदामध्ये असलेले दिसून येते.

वरील चारही वेदांपैकी सामवेदाला संगीत वेद म्हटले जाते. परंतु सगळयाच वेदांमध्ये संगीताचा उल्लेख आढळतो. महर्षी पतंजली यांच्या मते सहश्रवर्त्मा सामवेद : म्हणजे सामवेदाच्या १००० शाखा आहेत असे म्हटले आहे.

**सामवेदातील स्वर :** वैदिक काळात सप्तधातू ही संज्ञा सात स्वरांसाठी वापरलेली दिसुन येते. तसेच सामवेदामध्ये पाच प्रकारांच्या स्वरांचे वर्णन दिसून येते. उदात्त, अनुदात्त, स्वरीत, प्रचय आणि सन्नतर नारदीय शिक्षा या ग्रंथात सात स्वरांची व्याख्या खालील प्रमाणे केली आहे.

**प्रथमश्च व्दितीयश्च तृतीयश्च चतुर्थकः** । मन्द्र क्रुष्टो अतिस्वार एतान कुर्वन्ति सामगाः । म्हणजे प्रथम, व्दितीय, तृतीय, चतुर्थ, मन्द्र, क्रुष्ट आणि अतिस्वार्य या सर्व स्वरांच्या माध्यमातून सामगान केले जाते. वैदिक काळांतच षड्ज, ऋषभ, गांधार या व्याख्या प्रचारात आल्या होत्या. सामवेदातील सात स्वर म्हणजे सप्तक हे आजच्या आधुनिक काळातील काफी थाटाशी साधर्म्य पावतात. दक्षिणात्य पंडीत के.एम.शेषगिरी शास्त्री यांच्या मते साम सप्तक अभोगी रागासारखे आहे. अभोगी चा थाट काफी मानला जातो. त्यामुळे अनेक विद्वानांच्या मते साम सप्तक हे काफी थाटासारखे समजले जाते.

सामवेदामध्ये स्वराला 'यम' म्हटले जात असे. तीन स्वरांच्या गायनाला 'सामिक' म्हणत 'सामिक' शब्दावरूनच असे लक्षात येते की, 'साम' तीन स्वरांमध्ये गायले जात असे. 'ग रे सा' या तीन स्वरांमध्ये सामगान होत असे. यांची नावे प्रथम, व्दितीय, तृतीय अशी होती. गांधार नंतर एक स्वर उंच म्हणजे मध्यम स्वराची उत्पत्ती झाली त्याचे नाव कृष्ट असे पडले. निषादाच्या खालचा स्वर मिळाला त्याचे नाव मंद असे सांगितले. आणि त्यानंतर जो स्वर उत्पन्न झाला त्याचे नांव



Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

अतिस्वर किंवा अतिस्वार्य असे आढळते. वरील सर्व स्वरांचा ज्या क्रमाने समुह केला आहे त्याला 'साम' म्हटले जात. तीन स्वरांचे वेदकालीन संगीत हळुहळु पूर्णपणे विकसित होत गेले आणि साम ग्राम तयार झाले. साम ग्राम अवरोही क्रमाने खालील प्रमाणे आहे.

| साम ग्राम | आधुनिक स्वर |
|---|---|
| क्रुष्ट | मध्यम (म) |
| प्रथम | गांधार (ग) |
| व्दितीय | ऋषभ (रे) |
| तृतीय | षडज (सा) |
| चतुर्थ | निषाद (नि) |
| मंद्र | धैवत (ध) |
| अतिस्वार्य | पंचम (प) |

वरील प्रकारे स्वरांची अवरोही क्रमाने आधुनिक काळातील स्वरांची नावे विकसित झाली. सामगायनाचे सात भाग होते.

१) हुँकार / हिकार २) प्रस्ताव ३) आदि ४) उद्‌गीथ ५) प्रतिहार ६) उपद्रव ७) निधन

सामगायनात मुख्य गायकाला उद्‌गाथा म्हटले जात, उद्‌गाथा चे दोन सहगायक किंवा सहायक असतात. त्यांना अनुक्रमे प्रस्तोता आणि प्रतिहर्ता म्हटले जाते. गाथाच्या गायकांना गाथीन् म्हणतात. सामच्या गायकांना सामग, उद्‌गाथ, सामविप्र तसेच स्तांमतष्टा अशी अनेक नावे आहेत.

**सामगानाची स्वरलीपी**

सामगानाची एक स्वरलीपी आहे. म्हणजेच भारतीय संगीतात ४००० वर्षापूर्वीच स्वरलीपी होती. सामगानाच्या स्वरांची ऋषींनी स्वरलेखन पध्दत्ती तयार केली होती. संपूर्ण विश्वात ही स्वरलीपी सगळयात प्राचीन स्वरलीपी मानली जाते. सामगानाचे सगळे मंत्र या स्वरलीपीमध्ये आजही लिहीलेले सापडतात. त्यामुळे आजही सामगान त्याच स्वरूपात गायील्या जावू शकते. ज्या स्वरापासून सामगायनाची सुरूवात होते त्या स्वराचा डोक्यावर अंक/आकडा लिहीलेला असतो. त्याच स्वराला आरंभिक स्वर म्हटले जाते. ज्या स्वरापासून सामगानाला प्रारंभ होत असे त्या स्वराला सामचा प्रथम अथवा आधार स्वर किंवा की नोट म्हटले जाते. क्रुष्ट स्वर उंच स्वर मानला जातो आणि अतिस्वार्य म्हणजे सगळयात खालचा स्वर मानला जातो. वात्सायन यांच्या मते 'अति स्वरेण क्रुष्ठेण प्रारम्भो न कदाचन' म्हणजेच अतिस्वार किंवा क्रुष्ठ स्वरापासून आरंभ करून नये. ऋचांच्या डोक्यावर जर 'र' अक्षर लिहीलेला असेल तर त्याचा अर्थ त्या अक्षराचा स्वर हा दिर्घ आहे. म्हणजेच तो स्वर दोन मात्रांपर्यंत गायचा असा त्याचा अर्थ होतो. आणि एखाद्या अक्षराच्या समोर जर अवग्रह असेल तर तो स्वर पण दिर्घ उच्चारायचा 'उ' हे उंच स्वर समजायचे आणि 'क' हे खाली द्योतक समजायचे. दोन उभ्या रेषा म्हणजे एक पर्व म्हटले जाते. एका पर्वाला साधारणपणे एका श्वासात म्हटले जाते असे.



PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

**सामगायनाची पध्दत**

सामगीताचे मुख्य पाच भाग असतात आणि त्या भागानूसार त्यांचे गायन केले जाते. सामगायनाची सुरूवात प्रस्तावापासून केली जाते. त्यामध्ये हुँकारापासुन सुरूवात केली जाते. उद्गाथ, प्रस्तोता आणि प्रतिहर्ता हे तिनही गायक मिळून हुँकाराचे उच्चरण करतात. त्यानंतर प्रस्तावामध्ये ओंकार गायीला जातो याला गायनाचा मुखडा म्हणता येईल. त्यानंतर उद्गाथा उद्गीथ नावाच्या भागाचे गायन करतात उद्गाथा चा अर्थ उंच गायन करणे आणि उद्गाथा म्हणजे उंच स्वरात गायन करणारा गायक. प्रतिहर्ता प्रतिहाराचे गायन करतो त्यानंतर खंड देवुन पुन्हा उद्गाथा गायन करतो. या खंडाला उपद्रव म्हणतात. शेवटच्या भागाला निधन म्हणतात. निधन चा अर्थ गीताचा / गायनाचा शेवटचा भाग. निधन भागाला तीनही गायक स्वरो उच्चारण करतात. साम गायनामध्ये काही वर्णांचा उपयोग केला जातो ज्यांना अर्थ नसतो. परंतू साम गायनाला पुर्णत्वाकडे नेण्यासाठी त्या वर्णांचा प्रयोग केल्या जातो.

वेदामध्ये मुख्य छंद गायत्री, उष्णिक, अनुष्टपु, बृहती, पंक्ति, त्रिष्टुभ आणि जागती इ.आहेत. सामगायनात लय निश्चित करण्यासाठी तीन मत्रांचा उपयोग केल्या जात असे. त्यामध्ये ह्रस्व, दिर्घ तसेच प्लुत लयीशिवाय कोणतेही गायन होवू शकत नाही. लयीसाठी सामवेदाच्या संहिता पाठामध्ये छंदाचा उपयोग केल्या जात असे. त्यासाठी ह्रस्व म्हणजे एक मात्रा, दिर्घ म्हणजे दोन मात्रा, आणि प्लुत म्हणजे तीन मात्रा. अशा प्रकारे तालाचा वापर सामगायनामध्ये करीत असत.

**सामगायनाची वाद्य परंपरा**

वाद्यांची निर्मिती हे मनुष्याइतकीच प्राचीन आहे. वैदिक युगामध्ये जास्तीत जास्त वाद्ये थापेनी वाजविली जात असत. त्यामध्ये दुंदुभि, आडम्बर, भूमि दुंदुभि इ.वाद्यांचा उल्लेख मिळतो. वनस्पति वाद्य म्हणजे लाकडाने बनविलेला ढोल तसेच अधाति म्हणजे झांझ किंवा मंजीरा सारख्या वाद्यांचा उल्लेख वैदिक काळात मिळतो. तार वाद्यांमध्ये कांडवीणा, कर्करीवीणा म्हणजे शंभर तारांची वीणा, कर्कटीका, स्तम्बलवीणा, तालुकवीणा इ. विणांचा उल्लेख वैदिक काळात मिळतो. पिच्छोला हे वाद्य फुंकुन वाजविण्याचे होते. म्हणजे पिच्छोला हे सुषिरवाद्य होते असे म्हणू शकतो. तसेच शततंत्री वीणा, महती वीणा, पीनाकी वीणा, घोषवती, कोनिला, कच्छपी, रावणी, औदुंबरी वीणा इ.अनेक वीणांचा उल्लेख मिळतो.

वैदिक काळात पिंगा वाद्याचा उल्लेख मिळतो आजही हे वाद्य मध्यप्रदेशातील गौड आणि कोलस या लोकांमध्ये आढळुन येते. याच काळात 'अलाबु नावाच्या वाद्याचा उल्लेख मिळतो. संगीत तज्ञाच्या मते सारंगी वाद्याचा मुळ आधार 'अलाबु' वाद्य आहे म्हणूनच या वाद्याला अलाबुसारंगी असेही म्हटले जाते. म्हणूनच असे म्हटले जाते की संपूर्ण विश्वात कमानीने किंवा bow ने वाजविल्या जाणाऱ्या वाद्यांचा संबंध कुठेतरी भारतीय कमानीने वाजविल्या जाणाऱ्या वाद्यांशी आहे.

डमरू हे वाद्य प्राचीन धनवाद्य आहे आणि त्यातुनच पुढे मृदंगाची उत्पत्ती झालेली दिसून येते. पौराणिक काळात मृदंगाला 'पुष्कर' वाद्य देखील म्हणत असत.

अशा प्रकारे वैदिक काळात भारतीय संगीताची उत्पत्ती आणि विकास त्या काळाच्या परिस्थितीनूसार झालेला आढळुन येतो. आणि अनेक वर्षांच्या ऐतिहासिक परीवर्तनशीलतेमधुन भारतीय संगीत समृध्द होत गेले आणि आज संगीताचा विकासाचा पाया हा वैदिक काळातील संगीतावरच आधारीत असलेला दिसून येतो. म्हणूनच भारतीय संगीतात



Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

वैदिक काळाला विशेष महत्व दिले जाते. वैदिक काळातील संगीत क्रियात्मक, सैध्दांतिक, अध्यात्मिक आणि व्यवहारीक दृष्टीने समृध्द होते. वैदिक काळातील संगीत परंपरा ही सुरूवातीच्या / प्राथमिक अवस्थेत नसून पूर्ण विकसित झालेली गौरवशाली परंपरा होती. म्हणूनच प्रो.पंकजमाला शर्मा असे म्हणतात की, ऋग्वेद में संगीत का जो विकसित रूप प्राप्त होता है, वह सौ या दो सौ वर्षो के विकास का रूप नही है, अपितु पूर्वकालीन हजारों वर्षों की साधना का परिणाम है ।

**संदर्भ ग्रंथ**

१. भारतीय संगीत का इतिहास - जयदेवसिंह ठाकूर
२. सामगानः उद्भव व्यवहार एवं सिध्दांत - डॉ.पंकजलमाला शर्मा
३. भारतीय संगीत का इतिहास - डॉ. शरतचंद्र परांजपे
४. संगीत रत्नावली - अशोककुमार र्यमन
५. भारतीय संगीत का इतिहास - उमेश जोशी



Govt. College of Arts & Science ★ Aurangabad ★
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad